नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०१/०४/२०२५ (मंगळवार)

---

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द नविन कायदा— भारतीय न्याय संहीता २०२३ मधील संघटीत गुन्हेगारी च्या कलमान्वये गुन्हा नोंद, ६ आरोपी अटक, भिवापुर पोलसांची कारवाई

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— दिनांक ३०/०३/२०२५ रोजी भिवापुर पोलीस रात्रगस्त करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, भिवापुर कडुन उमरेड च्या दिशेने बोलेरो पिकअप एम. एच. २७ बी.एक्स ६८४५ ही पाठीमागुन लाकडी पाटया लावुन संशयीत रित्या जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी वाहन शोधण्या कामी पेट्रोलींग केली असता **संशयीत बोलोरो पिकअप एम. एच. २७ बी.एक्स ६८४५ हे वाहन** भिवापुर कडुन उमरेड च्या दिशेने भरधाव वेगाने जाताना दिसले. सदर वाहनाचा पाठलाग केला असता **एक लाल रंगाची हुंडाई आय २० गाडी क्र एम. एच. ४३ ए. टी ४५११** ही पोलीस वाहनाच्या मागे पुढे असुन पोलीसांना बोलोरो पिकअप वाहनाला ओव्हर टेक करू देत नव्हती. तसेच त्यांना पळुन जाण्यास मदत करत होते. पोलीसांनी बोलेरो पिकअप गाडीला ओव्हरटेक करून मरूपार गावाचे जवळ बोलेरो पिकअप एम. एच. २७ बी.एक्स ६८४५ हे वाहन थांबवले असता वाहन चालक व साथीदार वाहन सोडुन पळुन गेले. वाहनाच्या पाटया काढुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये **१३ गोवंश जनावरे** बाधुंन निर्दयते कोंबुन, चारापाण्याची व्यवस्था न करता वाहतुक करतांना मिळुन आले. शासकीय वाहनास अडथळा निर्माण करणारी हुंडाई आय २० गाडी क्र एम. एच. ४३ ए. टी ४५११ ही गाडी पोलीसांनी थांबवुन त्यातील चालक व त्याचा साथीदार यांना नाव पत्ता विचारले असता चालक आरोपी क्र. **१ अजय धनराज चौधरी, वय २७ वर्ष रा. नागतरोली ता. भिवापुर व त्याचा साथीदार आरोपी क्र २ श्रीकांत यादवराव चौधरी वय २५ वर्ष रा. नागतरोली ता. भिवापुर** अशी माहीती प्राप्त झाली. आरोपी क्र १

याला बोलेरो पिकअप एम. एच. २७ बी.एक्स ६८४५ च्या चालक ,त्याच्या साथीदार आणि वाहन मालकाचे नाव पत्ता विचारले असता बोलेरो पिकअप चालक आरोपी क्र **३. अक्षय राजु वाघमारे , रा दिघोरा ता भिवापुर** आणि त्याचा साथीदार **आरोपी क्र ४. शुभम तुकाराम चौधरी, रा. दिघोरा ता भिवापुर, आणि बोलेरो पिकअप वाहन मालक आरोपी क्र ५ नामे आदित्य मोरश्वर खापर्डे, रा शुक्रवारी वार्ड, पवनी, जि. भंडारा** अशी माहीती प्राप्त झाली. नमुद आरोपीतांनी संगणमत करून **१३ गोवंश जनावरे** बाधुंन निर्दयते कोंबुन, चारापाण्याची व्यवस्था न करता वाहतुक करतांना मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष **एक बोलोरो पिकअप एम. एच. २७ बी.एक्स ६८४५ किंमती ४,५०,०००/— रूपये , १३ गोवंश जनावरे किंमती १,७६,००० /— रूपये आणि हुंडाई आय २० गाडी क्र एम. एच. ४३ ए. टी ४५११ किंमती ६,००,००० /— रूपय एकुण किंमती १२,२६,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपी यांच्या विरूध्द कलम ११(१) (डी) (ई) (एफ) प्रा. छ. अधि, सहकलम ५(ए), ९ महा. प्राणी संरक्षण अधिनियम , सहकलम ११८ मपोका ,सहकलम १३४,१७७ मोवाका, सकलम २२१,३२५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलसांनी सदर गुन्हयात आरोपी नामे **१. अजय धनराज चौधरी, वय २७ वर्ष रा. नागतरोली ता. भिवापुर , २ श्रीकांत यादवराव चौधरी वय २५ वर्ष रा. नागतरोली ता. भिवापुर आणि ३. मोरश्वर खापर्डे, रा शुक्रवारी वार्ड, पवनी, जि. भंडारा यांना दिनांक ३१/०३/२०२५ रोजी अटक केली व त्यांची सखोल विचारपुस करून त्यांच्या गुन्हे रेकॉर्डची पाहणी केली असता त्यांच्यावर गो तस्करी बाबत अनेक गुन्हे दाखल असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. सदर गुन्हयात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीसांनी संगठीत गुन्हेगारी बाबत प्रस्ताव श्रीमती वृष्टी जैन ,उपविभागिय पोलीस अधिकारी तथा सहा पोलीस अधिक्षक, उमरेड यांच्या कडे पाठवुन सदर गुन्हयात परवानगी प्राप्त करून सदर गुन्हयात भारतीय न्याय संहीता कलम ११२ (संघटीत गुन्हेगारी) अन्वये कलम वाढ करण्यात आले आहे. अटक अरोपीतांचा १ दिवस पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आला आहे.**

आज दिनांक ०१/०४/२०२५ रोजी आरोपी १. **अक्षय राजु वाघमारे वय २८ वर्षे, रा दिघोरा ता. भिवापुर ,**२. **शुभम तुकाराम चौधरी, वय २६ वर्षे , रा दिघोरा ता भिवापुर, ३. सचिन धनराज वैदय, वय ३३ वर्षे,रा आकोट, ता पवनी,जि भंडारा** या ३ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. आत पर्यंत सदर गुन्हयात नमुद ६ आरोपीतांना अटक करण्यात आली

आहे. सदर गुन्हयात अजुन इतर आरोपीतांचा सहभाग निष्पन्न होण्याची शक्यता असल्याने त्या दिशेने तपास करण्यात येत आहे.तसेच गुन्हयात वापरलेल्या वाहनांबाबत सुध्दा सखोल तपास भिवापुर पोलीस करीत आहेत.






आरोपी अजय धनराज चौधरी




आरोपी श्रीकांत यादवराव चौधरी



आरोपी शुभम तुकाराम चौधरी



आरोपी आदित्य मोरश्वर खापर्डे



आरोपी सचिन धनराज वैदय



आरोपी अक्षय राजु वाघमारे

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हे नोंद पोलीस स्टेशन मौदा आणि पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत उपविभागिय पोलीस अधिकारी , कन्हान यांची कारवाई

दिनांक ३१/०३/२०२५ रोजी श्री संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधीकारी ,कन्हान हे त्यांच्या पथकासह उपविभाग कन्हान हद्दीत अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, अवैधरित्या रेतीची वाहतुक केली जात आहे. श्री संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधीकारी ,कन्हान यांच्या पथकाने खालील प्रमाणे पोलीस स्टेशन मौदा आणि कन्हान अंतर्गत दोन कारवाई केल्याने गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन मौदा** :— गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, पांढऱ्या व निळया रंगाचा १० चक्का ट्रक क्र. एम. एच. ४० सी. एक्स. १९५१ या वाहनाने अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे वडोदा शिवार, समोर स्वप्नील

ढाब्या समोर नाकाबंदी केली असता पांढ—या व **निळया रंगाचा १० चक्का ट्रक क्र. एम. एच. ४० सी. एक्स १९५१** हे संशयीत वाहन मिळुन आले. पोलीसांनी वाहन चालकास वाहन थांबविण्याचा इशारा केला. वाहनास थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये रेती मिळून आली. वाहन चालक **आरोपी क्र १ नामे बादल आनंदराव बावणे,वय ३३ वर्षे, रा.गोपेवाडा ता. जि. भंडारा आणि क्लिनर आरोपी क्रं २ नामे विपूल देवा वैदय, वय २६ वर्षे, रा. गोपेवाडा ता. जि. भंडारा हे मिळुन आले.** त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांनी कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. मालकाचे नाव विचारले असता **आरोपी क्र ३. वाहन मालक निखील शिवशंकर बांते रा. भिलेवाडा, यांच्या सांगण्यावरून अवैध रित्या रेतीची वाहतुक करत असल्याची माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) १० ब्रास रेती किंमती ५०,००० /— रूपये आणि २) ट्रक क्र. एम एच ४० सी एक्स १९५१ किंमती ४०,००,०००/— रूपये असा एकुण **४०,५०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद ३ आरोपीतांवर यांच्या विरूध्द पोस्टे मौदा येथे कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, बि एन एस. सहकलम ४८ (८),४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम व कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम,१९५७. कलम ३ सार्वजनीक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम,१९८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी क्र १ आणि २ यांना अटक करण्यात आली आहे.**

पोलीस स्टेशन कन्हान :— नमुद पथक कन्हान पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंदयांवर कारवाई करणे कामी पेट्रोलींग करत असतांना **ट्रॅक्टर क्रमांक एम. एच. ४० बी.जी. २४५६ व त्याची ट्रॉली क्रमांक एम. एच. ४० एल. ४३९०** हे संशयीत वाहन मिळुन आले. पोलीसांनी वाहनास थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये रेती मिळून आली. वाहन चालक **आरोपी क्र १ नामे अक्षय तिमाजी चांदेवालुके,वय २५ वर्षे, रा.बोरी सिंगोरी ता पारशिवणी आणि त्याचा आरोपी क्रं २ वाहन मालक नामे राहुल देविदास येरणे वय ३१ वर्षे, बोरी सिंगोरी ता पारशिवणी हे मिळुन आले.** त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांनी कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनामधुन १) ०१ ब्रास रेती किंमती ३,००० /— रूपये आणि २) ट्रॅक्टर क्रमांक एम. एच. ४० बी.जी. २४५६ व ट्रॉली क्रमांक एम. एच. ४० एल. ४३९० किंमती ३,००,०००/— रूपये असा **एकुण ३,०३,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद वाहन चालक आणि मालक यांच्या विरूध्द पोस्टे कन्हान येथे कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, बि एन एस. सहकलम ४८ (८),४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम व कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम,१९५७. कलम ३ सार्वजनीक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम,१९८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस स्टेशन मौदा कारवाई फोटो



**पोलीस स्टेशन कन्हान कारवाई फोटो**



## पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीविरूद्ध २ गुन्हे नोंद

## कन्हान पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक ३१/०३/२०२५ रोजी पोस्टे कन्हान येथील स्टाफ पोस्टे अवैध धंदयावर कारवाई कामी हद्‌दीत पेट्रोलींग करीत असता त्यांना अवैध जुगाराबाबत गोपनीय माहिती मिळाली .मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी खालील प्रमाणे कारवाई करून २ गुन्हे नोंद केले.

१. हनुमान नगर कन्हान ता.पारशिवनी येथे आरोपी नामे गणपती **विठोबा निकोसे,रा.हनुमान नगर कन्हान ता.पारशिवनी** हा कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्‌टीपट्‌टी चालवित आहे. अशा माहिती वरून पोलीसांनी धाड टाकुन **गणपती विठोबा निकोसे ,रा.हनुमान नगर कन्हान ता. पारशिवनी** याची झडती घेतली त्याच्या ताब्यातुन एक सट्टापट्टीचे आकडे लिहीलेला एक नोटबुक ,पेन , कॅलकुलेटर ,सट्टापट्टीचे आकडे ग्राहकांकडुन घेण्याकरीता वापरलेला एक ॲन्ड्रॉईड मोबाईल किंमती १०,०००/— रुपये, नगदी ६५०/— रुपये असा एकुण **१०,९२१/—रूपयांचा**

मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम १२ अमहाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

२. बोरडा कन्हान, ता.पारशिवनी येथे आरोपी नामे **१) संजय रामदास गुप्ता वय ४८ वर्ष रा. कांद्री वार्ड क्र. ०४ कन्हान पारशिवनी ,२) सूनिल मधूसूधन तिवारी वय ३७ वर्ष रा.कांद्री वार्ड क्र. ०४ कन्हान पारशिवनी**, कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टीपट्टी चालवित आहे. अशा माहिती वरून पोलीसांनी धाड टाकुन दोन्ही आरोपीतांच्या ताब्यातुन पंचासमक्ष १) रियलमी कपनीचा ॲन्ड्रॉईड मोबाईल २) सॅमसंग गेलेक्सी कंपनीचा ॲन्ड्रॉईड मोबाईल ३) ओपो कंपनीचा ॲन्ड्रॉईड मोबाईल, ४) हिरो कंपनीची स्पेलंडर मोटर सायकल क्र. एम. एच. ४० सी ७७७५ ५) होन्डा कंपनीची ऐविएटर मोटर सायकल क्र. एम. एच. ४० ए एच ३६१० ,रोख रक्कम ७००/— रुपये, पेन व इतर साहीत्य एकूण **किमंती १,५३,०९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## पोस्टे कन्हान हद्दीत सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

## उपविभागिय पोलीस अधिकारी , कन्हान यांची कारवाई

दिनांक ३१/०३/२०२५ रोजी श्री संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधीकारी ,कन्हान हे त्यांच्या पथकासह कन्हान पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, धरम नगर वार्ड क्र. ०५, कन्हान येथे एक महीला आरोपी कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टीपट्टी चालवित आहे. अशा माहिती वरून पोलीसांनी धाड टाकुन महीला आरोपीच्या ताब्यातुन पंचासमक्ष १) ३ सट्टापट्टीचे आकडे लिहीलेले कागदी चिट्ठया किमती सट्टापट्टीचे आकडे लिहीलेले नोटबूक ,रोख रक्कम ११६०/— रूपये, बॉल पेन ,स्टील स्केल, १ ओपो कंपनीचा ॲन्ड्रॉईड मोबाईल किमती १५,०००/— रूपये असा एकूण १६,१८५/— रूमुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम १२ अमहाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार समारंभ

दिनांक ०१/०४/२०२५ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार समारंभ नियोजीत करण्यात आला होता. सदर समारंभात श्री. रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण यांच्या हस्ते सेवानिवृत्त झालेले अधिकारी १.श्रेणी पोउपनि सुनिल शेषराव डोंगरे,नेमणूक पोस्टे दोषसिध्दी सेल,नागपुर ग्रामीण जिल्हा , २. सहायक फौजदार नंदलाल गणपतराव नानवटकर, नेमणूक पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण, ३.सहायक फौजदार प्रेमराज चंद्रभान सनेसर, नेमणूक पोलीस स्टेशन नरखेड नागपूर ग्रामीण, ४.पोलीस हवालदार नजीर मोहम्मद कुरेशी, नेम पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण ,५.पोलीस हवालदार चंद्रकांत भोलानाथ जारोंडे, बिनतारी संदेश विभाग, नागपुर ग्रामीण यांचा शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देवुन सत्कार करण्यात आला असुन श्री. रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण यांनी सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमात श्री. रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण, मानव संसाधन शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अजय मानकर व मानव संसाधन शाखेचे अंमलदार हजर होते.











पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर